प्रकरण पहिले : तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना आणि स्वरूप

1.1	तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना
1.2	तौलनिक साहित्याभ्यासाच्या व्याख्या
1.3	तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप
1.4	प्रभाव आणि प्रभव संकल्पनेचे महत्त्व
1.5	मराठी संगीत नाटक आणि 'तियात्रा'च्या तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप
1.6	समारोप
1.7	निष्कर्ष
1.8	संदर्भग्रंथ सूची

1.1 तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना

तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना आणि स्वरूप या पहिल्या प्रकरणात तुलनात्मक साहित्याभ्यासाची संकल्पना, तौलनिक साहित्याभ्यासाच्या व्याख्या, तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप, प्रभव आणि प्रभाव या संकल्पनांचे महत्त्व तसेच मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांच्या तुलनात्मक अभ्यासाचे स्वरूप या घटकांची चर्चा केली जाईल.

भारताच्या विविध प्रांतात वेगवेगळ्या प्रकारे नाटकाचे रूप पहावयास मिळते. उत्तरेतील रामलीला, दक्षिणेतील यक्षगान, कोकणातील दशावतारी नाटके इ. ही त्याची वेगवेगळी रूपे आहेत. यातील प्रत्येक कलाप्रकाराला वैशिष्ट्यपूर्ण इतिहास, परंपरा आणि सादरीकरण शैली लाभली आहे. या प्रत्येक कलाप्रकारामागील प्रेरणा आणि उद्देशही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मनोरंजनाबरोबरच मानवी जीवनातील विविध पैलूंवर भाष्य करणारे, प्रकाश टाकणारे असे हे कलाप्रकार आहेत. अशा सर्व कलाप्रकारांतून अनेकविध साम्यस्थळे आणि वैविध्यपूर्ण भेद दिसून येतात. कथानक, पात्रे, सादरीकरण, भाषाशैली, संवादशैली, अभिनय, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा, प्रकाशयोजना, यासारख्या अनेक मुद्द्यांच्या आधारे आणि तौलनिक साहित्याभ्यासाच्या आधारे असा अभ्यास करता येऊ शकतो.

मानवी जीवनात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा वेगवेगळ्या गोष्टींचा प्रचंड प्रभाव पडत असतो. त्यातूनच साहित्य आकार घेत असते. परंतु वेगवेगळ्या प्रदेशांत या घटकांचा प्रभाव उण्याअधिक प्रमाणात दिसून येत असतो. साहित्यकलाप्रकारांच्या मागे असणारी प्रेरणाही अनेकदा विविधांगी अशी असते. समाजात असणारी विविधता हे या सर्व भेदांचे कारण असते. तौलनिक साहित्याभ्यासाच्या मदतीने या साम्यभेदांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' हे दोन्ही नाट्यात्म साहित्यकलाप्रकार अत्यंत जवळच्या भौगोलिक प्रदेशातील असल्याने त्यांच्यात अनेकविध साम्यभेद दिसून येतात. कथानक, भाषाशैली, सादरीकरण, तांत्रिक मुद्दे (नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, प्रकाशयोजना, ध्वनीयोजना) यांच्या आधारे या दोहोंतील तुलनात्मक अभ्यास केला जाईल. त्याचबरोबर, मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांचा इतिहास, त्यांच्यावरील प्रभाव, त्यांच्या प्रेरणा, कालानुरूप झालेले बदल

यांचाही तुलनात्मक पद्धतीने अभ्यास केला जाईल. या साम्यभेदांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधाच्या विषयाच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना इंग्रजीच्या परिचयातून, स्वातंत्र्योत्तर कालखंडात, मराठीत आली आहे. ‘कम्पेरेटिव्ह लिटररी स्टडीज’ या संज्ञेचे ते थेट भाषांतर आहे. 1848 मध्ये मॅथ्यु अर्नोल्ड याने ‘तौलनिक साहित्य’ या संज्ञेचा सर्वप्रथम वापर केला. त्या नंतरच्या काळात या संज्ञेचा वापर सुरू झाल्यानंतर त्याविषयीची कुत्सित प्रतिक्रिया पारंपरिक अभ्यासकांकडून येऊ लागली. ‘तौलनिक साहित्य’ या संज्ञेला अनेकांनी विरोध केला कारण ‘तौलनिक साहित्य’ असे काहीच नसते. साहित्याचा अभ्यास हा तौलनिक स्वरुपाचा असू शकतो आणि या अर्थाने ‘तौलनिक’ हे विशेषण साहित्याचे नसून ते अभ्यासप्रकाराचे आहे असा त्यामागचा विचार आहे.

तुलना हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर माणूस वेगवेगळ्या स्वरुपाची तुलना करीत असतो. जीवन जगत असताना अनेक ज्या अनेकविध गोष्टी, घटना, प्रसंग, परिस्थिती माणसासमोर येतात त्यातून बऱ्यावाईट, आवडीच्या वा नावडीच्या गोष्टींची निवड करण्यासाठी माणसाला समोर असलेल्या सर्व पर्यायांची एकमेकांशी सारासार तुलना करावी लागते. या तुलनेच्या आधारावरच माणूस आपली निवड ठरवत असतो. अशा प्रकारच्या निवडी करताना माणसाची स्वत:ची आवड, पार्श्वभूमी, गतानुभव, बाह्य घटकांचा प्रभाव अशा अनेक गोष्टी कारणीभूत ठरत असतात. एकंदरीत वैश्विक स्तराचा विचार करता, मानवी जीवनात प्रचंड वैविध्य आहे परंतु त्याचबरोबर मानवी गरजा, मूल्ये यांच्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात समानता देखील दिसून येते.

साहित्यातही तुलना अतिशय महत्त्वाची ठरते. विश्लेषण, रसग्रहण आणि मूल्यमापन यांद्वारे साहित्याची समीक्षा करण्यात येते. मानवी जीवनातील विविध आविष्कार साहित्यात कोणत्या रूपाने प्रकट झाले आहेत याचा अभ्यास करण्यासाठी तुलना अतिशय आवश्यक असते. मानवी अनुभूतीचा आविष्कार इतर कलांच्या माध्यमातून कसा झाला आहे याचा विचार करून त्याचा साहित्यातील आविष्कार तुलनात्मकरित्या अभ्यासावा लागतो.

तौलनिक साहित्याभ्यास ही एक व्यामिश्र आणि गुंतागुंतीची अभ्यासपद्धती आहे. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विविध अभ्यासकांनी आपापली मते मांडली आहेत. यात भारतीय आणि पाश्चात्य अभ्यासकांचा समावेश होतो. तौलनिक साहित्याच्या विविध व्याख्या या अभ्यासकांनी मांडलेल्या दिसतात. परंतु त्यातून तौलनिक साहित्याचे व्यामिश्र रूप उलगडत नाही. तौलनिक साहित्य ही एक स्वतंत्र विद्याशाखा मानावी का? याबाबत देखील अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. मुळात, 'तौलनिक साहित्य' असे काहीच नसते. दोन साहित्यांची तुलना एवढाच मुद्दा इथे महत्त्वाचा ठरतो. साहित्य हे 'तौलनिक' नसते तर त्या 'साहित्याचा अभ्यास' हा 'तौलनिक' असतो त्यामुळे तौलनिक हे नामाभिधान साहित्याच्या अभ्यासाचे असते. म्हणूनच, 'तौलनिक साहित्य' असे न म्हणता 'तौलनिक साहित्याभ्यास' म्हणणे अधिक संयुक्तिक ठरते.

तौलनिक साहित्याभ्यासाच्या संकल्पनेचा विचार करता मानवी संस्कृती महत्त्वाची ठरते. मानवी जीवनातील गुंतागुंत आणि मानवाच्या जीवनातील सांस्कृतिक सरमिसळ यांचा परिणाम त्याच्या जीवनावर होत असतो. राजकारण, प्रवास, पर्यटन, शिक्षण, व्यापार यासारख्या विविध कारणांनी दोन वेगवेगळ्या मानवी संस्कृती एकमेकांसमोर येतात आणि त्यातून व्यापक प्रमाणात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भाषिक बदल घडत असतात. या सर्वच पातळ्यांवर फार मोठ्या प्रमाणात आदानप्रदान आणि देवाणघेवाण होते. त्यातूनच निर्माण होणाऱ्या साहित्याच्या विविध रूपांचा, प्रेरणांचा, स्रोतांचा अभ्यास करण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीचा प्रचंड उपयोग होतो. आदानप्रदानाच्या माध्यमातून देवाणघेवाण झालेल्या गोष्टींच्या अभ्यासासाठी तौलनिक साहित्याभ्यास पद्धती उपयुक्त ठरते.

तौलनिक साहित्याभ्यासाचा अवलंब आज जगभर होताना दिसतो. वेगवेगळ्या आयामांद्वारे साहित्यविषयक तुलना केली जाते. आशय, भाषाशैली, व्यक्तिरेखा, मांडणी, प्रभाव यांच्या आधारे साहित्यातील तुलना केली जाते. साहित्यातील प्रेरणा, चळवळ, प्रवाह, संप्रदाय यांचाही अंतर्भाव तुलनात्मक अभ्यासात केला जातो. तौलनिक पद्धतीने साहित्याभ्यास करताना लेखक, साहित्यकृती, साहित्यप्रकार, काळ, साहित्याचा इतिहास, तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय परिस्थिती,

प्रचलित विचारधारा, समाजव्यवस्था यांचाही अभ्यास केला जातो. स्थळकाळाचे कोणतेही बंधन नसलेली अभ्यासपद्धती या दृष्टीने तौलनिक साहित्याभ्यासाकडे पाहता येते.

व्याप्तीच्या दृष्टीने पाहता तौलनिक साहित्याभ्यास ही संपूर्ण विश्वाला व्यापणारी अभ्यासपद्धती आहे. वेगवेगळे देश, प्रदेश, संस्कृती, भाषा, मानवी जीवन, साहित्य यांचा विचार याच्या अंतर्गत होतो. दोन किंवा त्यापेक्षा अधिक साहित्यांतील परस्परसंबंध या अभ्यासपद्धतीत शोधला जातो. भिन्नभाषिक आणि भिन्न संस्कृती असलेल्या वेगवेगळ्या प्रदेशांतील साहित्यात असणारे साम्यभेद शोधणे हे तौलनिक साहित्याभ्यासाचे केंद्र आहे. वेगवेगळ्या प्रदेशांतील साहित्यातून अशा प्रकारे साहित्यिक साम्यभेद शोधून त्याद्वारे साहित्याचे तौलनिक आकलन आणि मूल्यमापन या प्रमुख उद्देशाने हा अभ्यास केला जातो.

1848 साली आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रात मॅथ्यु अर्नोल्ड याने इंग्रजी आणि युरोपीय साहित्याची तुलना केली होती. त्याआधी 1835 साली मेकॉले याने इंग्रज गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंक याला लिहिलेल्या आपल्या पत्रात पौर्वात्य आणि युरोपीय साहित्याची तुलना करत एकप्रकारे पौर्वात्य साहित्याची कुचेष्टाच केली आहे. मेकॉलेचा निष्कर्ष योग्य आहे की चूक? हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरेल परंतु लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची बाब म्हणजे, तुच्छ लेखण्याच्या हेतूने का होईना, मेकॉलेने पौर्वात्य आणि युरोपीय साहित्याचा तुलनात्मक विचार केला होता. आज तौलनिक साहित्याभ्यास संकल्पनेला वैश्विक रूप प्राप्त झाले आहे. या संकल्पनेची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची आणि व्यामिश्र असली तरी तिचे महत्त्व सर्व अभ्यासकांनी मान्य केले आहे.

तुलनेमुळे आपल्या अनेक अवगुणांचा, दोषांचा उघडपणे समाजासमोर उलगडा होईल याची भीती अनेकदा एखाद्या समाजाला, लेखकाला, अभ्यासकाला वाटू शकते. इतर प्रदेशांतील, संस्कृतीतील, भाषांतील साहित्यकृतीशी तुलना केल्यानंतर आपले लेखन, साहित्य त्यापेक्षा उण्या दर्ज्याचे आहे असा निष्कर्ष निघण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेकदा, एखाद्या विशिष्ट प्रदेशाचा इतिहास, संस्कृती, भुगोल, पर्यावरण, समाजजीवन यांमुळे तेथील साहित्य इतरांपेक्षा अधिक दर्जेदार असण्याची शक्यता निश्चित असू शकते. जगाच्या विविध प्रदेशांतील लोकजीवन हे टप्प्याटप्प्याने विकसित झालेले असल्याने या विकासाच्या वाटेवर त्यांनी इतरांचा आदर्श

डोळ्यांसमोर ठेवला असण्याची शक्यता बऱ्यापैकी असते. अशावेळी, या कारणामुळे त्यांच्यात साहित्यिक स्तरावर साम्य देखील दिसून येऊ शकते. परंतु, नंतरच्या टप्प्यावर विकसित झालेल्या समाजाने, तौलनिक विचाराद्वारे आपल्या साहित्याविषयी उणेपणाचा भाव बाळगण्याची गरज नाही. वास्तविक, कोणत्याही दोन किंवा अधिक साहित्यांच्या तुलनेने दोन्ही साहित्यांचा खऱ्या अर्थाने विकासच होत असतो. दोन्ही साहित्यांना विकासपूरक अशा अनेक प्रेरणा या तुलनेतून प्राप्त होण्याची शक्यता या अभ्यासात प्रचंड प्रमाणात असते. त्यामुळे, एकंदर साहित्याच्या वाढीसाठी आणि विकासासाठी तौलनिक साहित्याभ्यास हा निश्चित उपयुक्त असा प्रयत्न आहे.

1.2 तौलनिक साहित्याभ्यासाच्या व्याख्या :

कोणतीही गोष्ट, घटक, वस्तू वा संकल्पना यांचे स्पष्टीकरण होण्यासाठी त्याची व्याख्या निश्चित असणे आवश्यक असते. या व्याख्येमुळे प्रस्तुत बाबीसंदर्भातला विचार स्पष्ट होण्यास मदत होत असते. कोणतीही एखादी व्याख्या म्हणजे एखाद्या विशिष्ट गोष्टीबाबतचा विचार म्हणता येईल. ते त्याविषयीचे एक मत असते. कोणत्याही एखाद्या मुद्द्याच्या स्पष्टीकरणासाठी एकच एक व्याख्या परिपूर्ण असते असे नाही. एखाद्या व्याख्येतून ती संकल्पना स्पष्ट होईलच असे नाही. एखाद्या वस्तूची व्याख्या एखादे वेळेस एकच एक अशी निश्चित करता येऊ शकते. परंतु एखाद्या संकल्पनेची व्याख्या ही कायमस्वरुपी एकच एक असतेच असे नाही. एखाद्या संकल्पनेच्या संदर्भात अनेक अभ्यासकांची विविध मते आणि विचार असतात. एखाद्या संकल्पनेकडे पाहण्याचा एखाद्या अभ्यासकाचा विचार हा इतरांपेक्षा वेगळा असण्याचा संभव असतो. काळानुरूप एखाद्या संकल्पनेच्या चौकटीत वेगवेगळे बदल होत असतात. त्या बदलांचा मागोवा घेत नवनवीन व्याख्येच्या अनुरूप त्या संकल्पनेला त्या चौकटीत बसवावे लागत असते. यातूनच एखाद्या विशिष्ट संकल्पनेच्या विविध व्याख्या निर्माण होत असतात.

समकाळात देखील एखाद्या संकल्पनेच्या अनेकविध व्याख्या निर्माण होण्याची शक्यता असते. ज्या दृष्टीकोणातून अभ्यासक त्या संकल्पनेकडे पाहतो त्यावरूनही एखादी वेगळी व्याख्या निर्माण होण्याचा संभव असतो. अभ्यासकाची विविधांगी पार्श्वभूमी, अभ्यासकाचा विचार,

अभ्यासामागील उद्दिष्ट यासारख्या घटकांचाही त्यावर प्रभाव पडत असतो. कोणत्याही संकल्पनेच्या व्याख्येच्या मांडणीच्या आधारे, त्या संकल्पनेच्या संदर्भात भविष्यकाळातील संशोधनाला वाव मिळत असतो. कोणत्याही संकल्पनेच्या व्याख्या जेवढ्या अधिक असतील तेवढे विविधांगी दृष्टीकोण संशोधकांना, अभ्यासकांना मिळत जातात. तौलनिक साहित्याभ्यासाच्या संदर्भात देखील विविध अभ्यासकांनी विविध व्याख्या मांडलेल्या आहेत. या व्याख्यांचा विचार खालीलप्रमाणे करता येतो :

वसंत बापट : *''साध्यर्म्य आणि वैधर्म्य, उद्गम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला (तुलनात्मक) शोध.''*

पॉल वॅन टिघेम : *''तौलनिक साहित्याचा अत्यावश्यक हेतू म्हणजे निरनिराळ्या साहित्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांचा अभ्यास हाच होय.''*

एम्. एफ्. ज्यूयर्द : *''तौलनिक साहित्य म्हणजे आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधांचा इतिहासच होय.''*

एस्.एस्. प्रावर : *''एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतींची (साहित्यशास्त्र आणि समीक्षा यांवरील ग्रंथांसह) वैधर्म्य, साधर्म्य, मूलस्रोत किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय; तसेच दोन किंवा अधिक भिन्नभाषिक समाजान्मधील वाङ्मयीन संबंध आणि आदानप्रदान यांचाही अभ्यास त्यात अंतर्भूत आहे.''*

हेन्री एच्. रेमाक : *''तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमेपलिकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्परसंबंधांचा, तर दुसऱ्या बाजूला कला (म्हणजेच चित्र, शिल्प, वास्तूरचना, संगीत), तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे (म्हणजेच राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), विज्ञान, धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रद्धाक्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात, ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाङ्मयाची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना असते.''*

एफ्. डब्ल्यू. चॅंडलर : *''तौलनिक साहित्याभ्यास ही विशिष्ट पद्धतीचा अवलंब करणारी एक संकल्पना आहे. ही संकल्पना साहित्याकडे 'संपूर्ण साहित्य' या दृष्टीने पाहते. ही संपूर्णता भिन्न-भिन्न राष्ट्रीय*

साहित्यांच्या अंशानी साधलेली असते. साहित्याची ही संकल्पना भाषाशास्त्रापासून मात्र वेगळी आहे.''

आनंद पाटील : *''तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतीसापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून, सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी, वाङ्मय आणि इतर कला, साहित्य आणि शास्त्रे-विज्ञाने, साहित्य आणि नवी-जुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पद्धती यांच्या परस्परव्यामिश्र संबंधांनी अनेक विद्याशाखीय दृष्टीकोन वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा.''*

तुलनात्मक साहित्याभ्यासाच्या या सर्व व्याख्यांचा विचार करता तौलनिक साहित्याभ्यासाच्या संदर्भात एक निश्चित दिशा समोर येते. कोणत्याही दोन गोष्टींमध्ये असणारा समानतेचा धागा हा तौलनिक साहित्याभ्यासात अत्यंत महत्त्वाचा असतो. अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्या तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा विविध पैलूंद्वारे स्पष्ट करतात. प्रत्येक व्याख्येत तौलनिक साहित्याभ्यासाच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण आयाम दिसून येतात. या सर्व व्याख्यांच्या अभ्यासातून असे म्हणता येईल की, साम्यत्त्वाचा धागा असणाऱ्या कोणत्याही दोन बाबींचा समानता, वेगळेपण, परस्परसंबंध, परस्परपरिणाम तसेच त्यांच्या वाटचालींचा केलेला अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय. ज्यूअर्द, प्रावर, रेमाक, चँडलर यांच्या व्याख्येत वैश्विकतेचा संदर्भ दिसून येतो. प्रदेश, भाषा, प्रांत, संस्कृती या भेदांच्या पलिकडे जाऊन केलेला अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास. एकूण साहित्य हा एक पूर्ण घटक आहे आणि विविध भाषांतील, प्रदेशांतील, संस्कृतींतील साहित्य हे त्याचे अंश आहेत असे मानून चालणाऱ्या या अभ्यासपद्धतीत विविध कलाकृतींतील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, वैचारिक साम्यभेदांचा अभ्यास अपेक्षित आहे. विविध साहित्यकृतींच्या वा साहित्यांच्या तुलनात्मक अभ्यासातून साहित्यिक, सांस्कृतिक असे निष्कर्ष काढून त्याद्वारे मनुष्य जीवनाच्या भावी वाटचालीसाठी आवश्यक असे मुद्दे मांडणे हे या अभ्यासाचे महत्त्वाचे कार्य आहे.

1.3 तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप

तुलना हा मानवी जीवनाचा स्थायी भाव आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर माणूस तुलना करीतच असतो. सर्वसाधारणपणे ही तुलना भौतिक आणि व्यावहारिक स्वरूपाची असते. उदाहरणार्थ, एखाद्या वस्तूची खरेदी करताना दर्जा किंवा गुणवत्ता यांची पारख आणि निश्चिती करण्यासाठी माणूस त्या वस्तूची तुलना अन्य एखाद्या तत्सम नमुन्याशी करत असतो. तुलना करणे हा मानवाचा उपजत आणि जन्मजात गूण आहे. व्यावहारिक स्तरावरची तुलना करताना माणूस आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडी, अभिरुची, विशिष्ट आवश्यकता, पार्श्वभूमी यांचा विचार करण्याबरोबरच शिक्षण, ज्ञान, रसिकता यांचाही कळत-नकळत वापर आपण करत असतो. जीवनाच्या आजवरच्या वाटचालीत जे अनुभव आपण घेतले आहेत त्याद्वारे तसेच आपल्यावरच्या संस्कारमूल्यांच्या आधारानेही माणूस ही तुलना करीत असतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने अशी तुलना करून माणूस निर्णय घेत असतो. एखाद्या क्षेत्रातील माहिती वा ज्ञान मिळवण्यासाठी देखील तुलना आवश्यक ठरते.

साहित्याच्या क्षेत्रात ही तुलना अतिशय महत्त्वाची आहे. तुलना ही प्रांत, प्रदेश, भाषा, संस्कृती यांच्या पलिकडे जाऊन वैश्विकतेचा विचार करणारी बाब आहे. साहित्याच्या वाचनानंतर वा अभ्यासानंतर वाचकाच्या मनात त्याविषयीचा विचार सुरू होत असतो. हा विचार मनात निर्माण होतो तेव्हाच तुलनेचाही एक विचार वाचकाच्या मनात नकळत जागृत झालेला असतो. जे वाचले आहे त्याच्याशी साधर्म्य साधणारे किंवा त्यापेक्षा वेगळे असे काहीतरी वाचकाच्या मनात येतेच. संपूर्ण विश्वात भाषा, संस्कृती, वर्ण या पातळ्यांवर प्रचंड प्रमाणात भिन्नता दिसून येते. हे जरी असले तरी त्याचवेळी दुसऱ्या बाजूला या एकूण विश्वसाहित्यात अनेक प्रकारची समानतेची सूत्रे देखील दिसून येतात. बरे-वाईट मानवी गूण, आचार-विचार, भावभावना यांसारखे मुद्दे वेगवेगळ्या संस्कृतीत साम्यतेने आढळून येतात. कोणतेही साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा असते आणि या समान दिसून येणाऱ्या बाबी त्या साहित्याचा भाग होतात तेव्हा विविध प्रांतांतील साहित्यांत त्याचीच समानता प्रकर्षाने निदर्शनास पडते. ज्या प्रमाणे विविध प्रांतांत अनेक गोष्टी साम्यतेने दिसतात त्याचप्रमाणे भेदही असतात. इतिहास, भुगोल, अर्थकारण, राजकारण, प्राकृतिक वेगळेपण यासारख्या घटकांमुळे भिन्न-भिन्न प्रदेशांत काही भिन्नता देखील असण्याची शक्यता असते. कोणतेही दोन प्रदेश

हे पूर्णपणे समान, अंशत: समान किंवा पूर्णत: भिन्न अशा तीनही पातळयांवरचे असू शकतात. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज संपूर्ण विश्व एका लहानसा घटक बनून गेले आहे. संपूर्ण जगातील सर्व माहिती, ज्ञान, साहित्य यांचा सहज, सोपेपणी परिचय होणे शक्य झाले आहे. राष्ट्रीय साहित्याच्या अनुषंगाने विचार करता, एक राष्ट्र म्हणून, भारतीय साहित्यात ज्या विचारांचा वा मूल्यांचा परिचय वाचकाला होतो तेच मुद्दे विश्वातील अन्य प्रदेशांतील साहित्यातही दिसून येतात. उदाहरणार्थ, संत साहित्यातील जन-उद्धाराची भावना किंवा ईश्वराविषयीची तळमळ.

या साम्य-भेदांचा अभ्यास तुलनात्मक पद्धतीने करून अधिक व्यापक आणि प्रगत असा विचार विकसित करणे शक्य आहे. आपल्या आणि अन्य प्रदेशांतील साहित्यात साम्य आणि भेद हे असणारच हे गृहित धरले पाहिजे. वेगवेगळया प्रदेशांतील, संस्कृतीतील, भाषांतील साहित्यात काही समान तत्त्वे वा वेगळेपण आढळून येते. कोणत्याही दोन प्रदेशांतील साहित्यात जशी समानता असू शकते तसेच भिन्नता वा वैधर्म्य असणे हे स्वाभाविक आहे. याच समानता वा वेगळेपणांचा अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास. तौलनिक साहित्याभ्यासाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने विश्वसाहित्याचा विचार होतो हे मान्य करावे लागेल. तौलनिक साहित्याभ्यासाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावरील मानवी जीवनाचा विचार करणे शक्य होईल.

तुलनात्मक अभ्यास करणाऱ्या व्यक्तीने तुलना करताना अनेकविध मुद्द्यांची काळजी आणि दखल घेणे आवश्यक आहे. तुलनात्मक अभ्यास करायचा असेल तर अभ्यासकाला एकूणच स्थळकाळाच्या पलिकडे जाऊन अभ्यास करण्याची तयारी असली पाहिजे. आपली परिसरातील भाषा, संस्कृती, साहित्य यांची इतर प्रदेशांतील तत्सम घटकांशी तुलना करून अभ्यास करताना अभ्यासकाजवळ तटस्थ वृत्ती आणि पारदर्शक दृष्टीकोण असण्याची नितांत आवश्यकता आहे. आपल्या भाषा-संस्कृती-साहित्याबरोबरच इतर भाषा-संस्कृती-साहित्याचा अभ्यास करताना आपला विचार एकांगी होणार नाही याची खबरदारी कटाक्षाने घ्यावी लागेल. कोणत्याही एका प्रदेशातील भाषा, साहित्यावर एखाद्या विशिष्ट घटकाचा (उदा. इतिहास, भुगोल, राजकारण, अर्थकारण इ.) गंभीर प्रभाव पडण्याची शक्यता असते. त्यामुळे त्या साहित्याचा एखादा पैलू आपल्या साहित्याच्या तुलनेने खूपच वेगळा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, अशावेळी त्या मुद्द्याचा विचार हा

तेवढ्याच संतुलित पद्धतीने आणि तटस्थपणे केला पाहिजे. कोणत्याही प्रकारची तुलना करताना आपला विचार पूर्वग्रहदूषित दृष्टीकोणातून होणार नाही याची निश्चिती अभ्यासकाने करावी लागते. देश, भाषा, संस्कृती यांच्या पलिकडे जाऊन एक वैश्विक विचार या अभ्यासपद्धतीत अपेक्षित आहे. देश, भाषा, संस्कृती यांच्या सीमारेषा विसरून अभ्यास केल्यास तो खऱ्या अर्थाने तुलनात्मक अभ्यास होईल.

या जगातील एकूण मानवी जीवनाचा विचार करता त्यात अनेकतेचे विविध स्तर दिसून येतात. भाषा, संस्कृती, जीवनव्यवहार यासारख्या गोष्टी निरनिराळया प्रदेशांत वैविध्यपूर्ण पद्धतीने पहायला मिळतात. याचबरोबर मानवी इतिहास, भुगोल, राजकारण, अर्थकारण यासारख्या गोष्टी देखील एखाद्या समाजाला वेगळेपण प्राप्त करून देत असतात. परंतु, या भिन्नत्वांच्या जोडीलाच अनेक समानधर्मी पैलूही मानवी जीवनाच्या चौकटीत दिसू शकतात. मानवी गरजा, जीवनविषयक तत्त्वे, मानवापुढील अडचणी, यासारख्या गोष्टी समानच असतात. हे मानवी जीवनाचे वैश्विक सत्य या तुलनात्मक अभ्यासात महत्त्वाचे ठरू शकते.

राष्ट्रीय साहित्य या मुद्द्याच्या अनुषंगाने आपापल्या राष्ट्राचा, राष्ट्रीय साहित्याचा विचार आणि अभिमान जेव्हा जोर धरू लागला तेव्हा तौलनिक साहित्याभ्यासाच्या संतुलित आणि सारासार विचाराचा पर्याय समोर आला. राष्ट्र आणि भाषा या भेदांच्या पलिकडे जाऊन समग्र दृष्टीकोणातून साहित्याकडे पाहण्याची वृत्ती वाढीस लागली. या प्रयत्नांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर एकप्रकारे सहिष्णुता आणि सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. फक्त एखाद्याच विशिष्ट साहित्याचा विचार केला तर ते चुकीचे ठरेल हा विचार स्पष्ट झाला. एखाद्याच राष्ट्राचा वा साहित्याचा विचार हा संकुचित विचार ठरतो. त्याचप्रमाणे एखाद्याच राष्ट्रीय साहित्याचा आधार घेऊन एखादी संकल्पना निश्चित करणे हेही चुकीचे ठरेल.

कोणत्याही राष्ट्राच्या एकूण साहित्यात काहीएक समानता ही दिसून येतेच. एकंदर संस्कृतीचा, भुगोलाचा, निसर्गाचा, इतिहासाचा परिणाम म्हणून त्या राष्ट्रातील एकूण साहित्यात काही समान गुणधर्म दिसून येत असतात. हे गुणधर्म त्या राष्ट्रातील सर्वच भाषांतून प्रकट होत असतात. एक घटक या दृष्टीने राष्ट्र म्हणून त्या प्रदेशातील विविध भागांत साहित्यात दिसून येणारी समानता हा

विचार करण्याचा मुद्दा आहे. एखाद्या राष्ट्रात विविध प्रांतांत अनेक भाषा बोलल्या जात असतात. त्या-त्या भाषेची संस्कृती आणि पर्यावरण पूर्णपणे भिन्न असते मात्र एक राष्ट्र म्हणून विचार करता त्यांतर्गत असणाऱ्या या भिन्नत्त्वाला बांधून ठेवणारा एक राष्ट्रीयत्वाचा घटक महत्त्वाचा ठरतो. अनेकदा, एकच भाषा एकाहून अधिक राष्ट्रांमध्ये बोलली जात असते. उदाहरणार्थ, इंग्रजी भाषा बोलणारे अनेक देश आहेत परंतु एखादी भाषा एकाहून अधिक देशांत बोलली जात असली तरी त्या सर्व देशांतील राष्ट्रीय साहित्याचा स्वतंत्र विचार केल्यास ते समान असल्याचे दिसणार नाही.

साहित्य ही मानवी प्रतिभेतून आकाराला येणारी गोष्ट आहे. "एखाद्या राष्ट्रातील अनेक साहित्यिकांनी निर्माण केलेल्या साहित्याला काही समान गुणधर्म असतात हे मानणे कितपत संयुक्तिक आहे?" असा प्रश्न वसंत बापट यांनी उपस्थित केला आहे. "राष्ट्रीय वैशिष्ट्ये नावाची वस्तूच मुळात अस्तित्वात असते का? मानवी स्वभाव इथूनतिथून सारखा असे आपण म्हणतो तर मग भारतीय स्वभाव, इंग्लीश स्वभाव, अमेरिकन स्वभाव या शब्दांना तरी काय अर्थ राहिला? किंवा 'माणसे तेवढे स्वभाव' असे मानले तर समुदायाला स्वभाव असतो का?" असेही ते पुढे म्हणतात. या मुद्द्याचा विचार करता असे म्हणता येते की व्यक्तीगणिक जरी स्वभाव वेगवेगळा असला तरी कोणत्याही प्रदेशावर, राष्ट्रावर प्रभाव पाडणाऱ्या अनेक गोष्टी असतात. इतिहास, भुगोल, भाषा, संस्कृती यासारखे घटक समाजाला प्रभावित करत असतात त्यामुळे 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने स्वतंत्रपणा हा जरी वेगवेगळ्या साहित्यिकांच्या लेखनात दिसून येत असला तरी त्या लेखनामागील महत्त्वाची सूत्रे अनेकदा समान असतात. एखाद्या राष्ट्रातील, वरवर भिन्न-भिन्न दिसणाऱ्या साहित्याला एकत्र बांधून ठेवणारी ही सूत्रे राष्ट्रीय साहित्य या घटकाला जन्म देतात असे म्हणावे लागेल. उदाहरणार्थ, निसर्गाविषयीचे प्रेम, प्राणीमात्रांविषयीची तळमळ, समाजाच्या कल्याणाची भावना, ईश्वराबद्दलची श्रद्धा यासारख्या गोष्टी विविध भाषांतील साहित्यात समानपणे आलेल्या दिसून येतात. भिन्न-भिन्न भाषांतून त्याची अभिव्यक्ती जरी वेगवेगळ्या पद्धतीने झालेली असली तरी त्यामागील सूत्र एकच एक असते हे लक्षात घ्यायला हवे. याच समान सूत्रामुळे एखाद्या राष्ट्रातील मानवी जीवनाला आणि पर्यायाने तेथील साहित्याला जे बिरूद प्राप्त होते ते योग्य ठरते.

“राष्ट्रीय साहित्याच्या अभ्यासाने, राष्ट्रीय स्वभाववैशिष्ट्यांचा शोध घेण्याच्या खटाटोपातून दोषारोप करण्याची, उणेधुणे काढण्याची किंवा आत्मश्लाघा आणि परनिंदा करण्याची प्रवृत्ती प्रबळ झाली तर या सद्‌हेतूलाच तडा जाईल” असे वसंत बापट म्हणतात. भिन्न भिन्न राष्ट्रांतील साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाने सौहार्द आणि सहकार्य वाढावे ही अपेक्षा आहे हा वसंत बापटांचा मुद्दा अगदी योग्य आहे. कोणत्याही दोन साहित्यांची तुलना करून त्यातून एकमेकांच्या वाढीसाठीच्या, प्रगतीसाठीच्या शक्यतांचा शोध घेणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. परस्परभिन्न अशा दोन साहित्यांतून एकमेकांच्या लाभाचे असे काही मुद्दे निश्चित सापडू शकतात. अशा या मुद्‌द्यांचा शोध तौलनिक साहित्याभ्यासात अपेक्षित आहे.

1.4 प्रभाव आणि प्रभव संकल्पनेचे महत्त्व

विश्वातील एकूण साहित्यनिर्मितीचा विचार करता वेगवेगळया साहित्यांचा प्रभाव हा नंतरच्या काळातील समाज आणि साहित्यावर पडतो असे दिसून येते. साहित्याच्या क्षेत्रात जे आदानप्रदान होते त्यात हा प्रभावाचा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. कोणत्याही साहित्याचे प्रभावीपण हे साहित्यनिर्मितीसाठी फार सकारात्मक आहे. वेगवेगळया प्रदेशांतील, भाषांतील साहित्यिक अन्यभाषिक साहित्याचे स्वागत करतात, त्याला मान्यता देतात आणि त्याचा होणारा प्रभाव जाणीवपूर्वक स्वीकार करतात. कोणत्याही साहित्याचे स्वागत आणि त्याचा स्वीकार ही निश्चितच अतिशय स्तुत्य गोष्ट आहे. आपल्या साहित्यापेक्षा भिन्न असे जे काही अन्य साहित्यांत वा भाषांत आहे त्याचे स्वागत केल्याने आपलेच साहित्य विकसित होणार आहे हा विचार कोणत्याही प्रदेशातील साहित्यिकांनी करणे महत्त्वाचे आहे.

कोणत्याही साहित्यावर होणारा प्रभाव हा वेगवेगळया स्वरूपाचा असतो. भौगोलिकदृष्ट्या अन्य प्रदेशांतील साहित्य या प्रभावाचा एक महत्त्वाचा मुद्दा ठरते. आपल्या प्रदेशाच्या तुलनेत अन्य प्रदेशांतील साहित्यात असणारे वैविध्य, वेगळेपण हे साहित्यिकांना प्रेरणा देत असते. एकाच भौगिलिक परिसरात राहणाऱ्या साहित्यिकांच्या जीवनात भाषिक आणि सांस्कृतिक भेद हेही प्रभावाचे कारण ठरतात. अनेकदा, एकाच भौगोलिक प्रदेशातील आणि समान भाषा-संस्कृतीतील असूनही

काळाच्या दृष्टीने वेगळे असणाऱ्या समाजांवर देखील गतकाळाचा प्रभाव पडत असतो. कोणत्याही साहित्यात संकुचित विचाराला स्थान नसते. त्यामुळे अशा या प्रभावाचा स्वीकार करणे हे कमीपणाचे किंवा उणेपणाचे लक्षण मानण्याचे काहीही कारण नाही. भाषिक मर्यादांच्या पलिकडे जाऊन एका भाषेतील प्रतिभेचे आणि प्रतिभावंताचे अनुकरण अन्य भाषांतील लेखक करू लागतात.

कोणत्याही साहित्यावर पडणाऱ्या प्रभावाची कारणे भिन्न-भिन्न असू शकतात. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा वेगवेगळया कारणांनी जेव्हा भिन्न संस्कृती वा समाज समोरासमोर येतात तेव्हा त्यांच्या दरम्यान कळत-नकळत ही प्रभावांची देवाणघेवाण होतेच. उदाहरणार्थ, मोगलांची सत्ता आणि भारतीय साहित्यावर फारसी भाषेचा पडलेला प्रभाव; गोमंतकीय संस्कृती आणि भाषेवर पोर्तुगीज राजवटीचा पडलेला प्रभाव; शेक्सपियर, इब्सेन, इलियट यांचा मराठी रंगभूमीवर झालेला प्रभाव. कोणत्याही दोन संस्कृती, भाषा, समाज जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा त्यांच्यावर हा प्रभाव पडणे अटळ असते. या प्रभावाचे प्रमाण कमी-अधिक असण्याची शक्यता निश्चित असते परंतु दोहोंतील साम्यभेदांचा प्रभाव दोहोंवरही उणा-अधिक पडत असतो.

कोणत्याही घटकावर अन्य घटकाचा पडणारा प्रभाव याची दुसरी बाजू म्हणजे प्रभव. प्रभव म्हणजे निर्मिती. एखाद्या साहित्याच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या प्रभावातून जी नवनिर्मिती होते त्या प्रक्रियेला प्रभव म्हणतात. प्रभाव पडणे ही गोष्ट तशी सर्वसाधारणपणे नेहमीच घडताना दिसते. कोणताही एखादा घटक दुसऱ्या घटकावर प्रभाव पाडत असतो मात्र त्या प्रभावातून काही नवे निर्माण होते का? हे महत्त्वाचे असते. तौलनिक साहित्याभ्यास करताना प्रभाव आणि प्रभव या दोहोंचाही विचार अतिशय महत्त्वाचा ठरतो.

साहित्याच्या क्षेत्रात प्रभाव हा वेगवेगळया स्वरूपाचा असतो. रचनाबंध, आशय, शैली यांच्या स्वरूपात हा प्रभाव दिसून येत असतो. उदाहरणार्थ हायकू सारखा रचनाबंध, शोकात्मिका/शोकान्तिका यांच्यासारखे प्रकार यांचा केलेला स्वीकार हा याच प्रभावाचा परिणाम म्हणता येईल. परंतु, कोणत्याही दोन साहित्यांत साधर्म्य आढळले म्हणून तेथे प्रभाव असलाच पाहिजे असे नाही. सदृश अशी संस्कृती, समाजव्यवस्था, आर्थिक स्थिती, राजकीय वातावरण यांसारख्या

कोणत्याही एका वा अनेक कारणांमुळे कोणत्याही दोन साहित्यांत समानता दिसून येण्याची शक्यता आहे. परंतु अशावेळी त्यापैकी एक साहित्य 'देणारे' आणि दुसरे 'घेणारे' असा प्रकार नसतो.

प्रभाव हा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असा कोणत्याही स्वरूपात असू शकतो. एखाद्या घटकाच्या थेट संपर्कात आल्याने एखादी नवनिर्मिती होणे शक्य असते. त्याचप्रमाणे त्या घटकाच्या एखाद्या वेगळ्या रूपाचा परिणाम म्हणून ज्यावेळेस एखादी निर्मिती होते त्यावेळेस हा प्रभाव अप्रत्यक्ष स्वरूपाचा म्हणता येतो.

1.5 मराठी संगीत नाटक आणि 'तियात्रा'च्या तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप

मराठी साहित्यात नाटक या साहित्यकलाप्रकाराचे स्थान आगळेवेगळे आहे. साहित्यप्रकार आणि कलाप्रकार अशा दोन्ही वर्गात मोडत असल्याने नाटक हा वैशिष्ट्यपूर्ण घटक ठरतो असे वि. भा. देशपांडे यांचे मत आहे. त्यांचे हे मत निश्चितच योग्य आहे. एकूणच रंगभूमीचे वैविध्य हे लक्षणीय आहे. देशाच्या विविध भागांत रंगभूमीचे स्वतंत्र आणि आगळेवेगळे रूप पहावयास मिळते. उत्तरेस रामलीला, दक्षिणेत यक्षगान यासारखे नाट्यप्रकार प्रचलित आहेत. मराठी प्रदेशातच नाटकाची वेगवेगळी रूपे पहायला मिळतात. वगनाट्य, दशावतारी नाटके यासारखे वैविध्यपूर्ण प्रकार आपणास पहायला मिळतात.

संगीत नाटक हा मराठी नाटकाचा आगळावेगळा प्रकार आहे. संगीताचा अंतर्भाव असणारे अनेक प्रकार आपणास पहायला मिळतात. शास्त्रीय संगीताचा वापर करून, शास्त्रीय संगीतातील रागरागिण्यांच्या आधाराने गीतांच्या चाली बांधून, त्या गीतांच्या माध्यमातून कथानक आणि प्रयोग पुढे घेऊन जाणे हे वैशिष्ट्य मराठी संगीत नाटकात दिसून येते. 19 व्या शतकात मराठी संगीत नाटकाची परंपरा सुरु झालेली दिसते. आरंभी, राजदरबाराच्या चौकटीत असणारे संगीत नाटक कालांतराने सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचले. समाजाचे मनोरंजन आणि प्रबोधन अशा दुहेरी पातळीवर मराठी नाटकाचे कार्य दिसून येते. यात संगीत हा घटक आल्याने मराठी नाटकाचा एक वेगळाच प्रदेश समोर आला. गीतांच्या माध्यमातून कथानक सांगत असतानाच त्याद्वारे रसिकांची सांगीतिक भूक शमवण्याचे कार्यही मराठी संगीत नाटकाने केले आहे.

गोवा हा महाराष्ट्राच्या नजिकचा, भौगोलिकदृष्ट्या अत्यंत निकटचा प्रदेश. दोन्ही प्रदेशांचा भुगोल जरी सर्वसाधारणपणे समान असला तरी दोन्हींच्या संस्कृतीत अनेक भेदही आहेत. गोव्यात मराठीसोबतच कोंकणी भाषेचाही वापर केला जातो. गोव्यात कोंकणी भाषा देवनागरी आणि रोमी अशा दोन लिपींत लिहिली, वाचली जाते. यातीलच रोमी कोंकणी लिपीत लिहिले जाणारे 'तियात्र' हे कोंकणी रंगभूमीचे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. मराठी संगीत नाटकाप्रमाणेच कोंकणी 'तियात्रा'तही संगीत या घटकाचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. रचनाबंध, कथानक, सादरीकरण, शैली यासारख्या अनेक पातळ्यांवर मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांत साम्यभेद आहेत.

पौराणिक, सामाजिक, राजकीय अशा वेगवेगळ्या विषयांवर ज्याप्रमाणे मराठी संगीत नाटक निर्माण झाले आहे त्याचप्रमाणे कोंकणी 'तियात्रा'तही असे वेगवेगळे पैलू दिसून येतात. भाषा, शैली यासारखे मुद्दे या दोहोंत भेद म्हणून दिसतात तर कथावस्तू, मांडणी, संगीत यासारखे मुद्दे त्यांतील साम्यस्थळे आहेत. मराठी संगीत नाटकाचा उगम 19 व्या शतकाच्या मध्यावर झालेला असला तरी व्यापक अर्थाने मराठी संगीत नाटक 19 व्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांतच आकाराला आले. कोंकणी 'तियात्रा'चा आरंभही 19 व्या शतकाच्या अखेरच्या दशकात झाला. त्यामुळे कालमानाच्या दृष्टीने दोन्ही साहित्यकलाप्रकार समांतर असलेले दिसतात.

मराठी संगीत नाटकाच्या आरंभकाळी पौराणिक कथानके आलेली दिसतात परंतु कालानुरूप या कथानकांचे स्वरूप सामाजिक, राजकीय असे बदलत गेलेले दिसते. परंतु, कोंकणी 'तियात्र' सामाजिक विषयांवर अधिक भर देताना दिसते. मराठी संगीत नाटकांतील नाट्यपदे हा नाटकाचा आणि नाट्यप्रयोगाचा अविभाज्य भाग म्हणून समोर येतात परंतु कोंकणी 'तियात्रा'तील पदे कधी कथानकाचा भाग म्हणून तर कधी नुसतीच मनोरंजनार्थ आलेली दिसतात. 'कांत' ही पदे कथानकाला अनुसरून असतात आणि कथानकाचे वहन करतात. मात्र, 'कांतार' ही पदे दोन प्रसंगांच्या, दोन प्रवेशांच्या दरम्यान येतात आणि त्यांचा कथानकाशी काहीही संबंध नसतो. रंगमंचावरील नेपथ्य बदलासाठी आवश्यक तेवढा वेळ मिळावा आणि दरम्यान रसिकांना खिळवून ठेवणे या हेतूने कोणत्याही एखाद्या मुद्द्यावर सादर केल्या जाणाऱ्या गीताला 'कांतार' म्हणतात.

आकृतीबंध, कथाबीज, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, गीत, संगीत, वाद्ये, तांत्रिक मुद्दे यासारख्या अनेक घटकांच्या आधाराने मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' यांचा तौलनिक अभ्यास करणे शक्य आहे. एकाच काळात उदयास आलेल्या या दोन्ही कलाप्रकारांचा नंतरचा प्रवास मात्र वेगवेगळा झालेला दिसतो. त्यांच्यातील साम्यभेदांचा अभ्यास दोन्ही साहित्यकलाप्रकारांच्या वाढीसाठी अतिशय उपयुक्त ठरणारा आहे.

1.6 समारोप

तौलनिक साहित्याभ्यास ही अभ्यासपद्धती वेगवेगळ्या साहित्यांच्या विविध आयामांचा वेध घेऊन त्याद्वारे त्या साहित्यांच्या वाढीसाठी पोषक ठरणारी अभ्यास पद्धती आहे. तुलना हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे आणि आयुष्याच्या प्रत्येक स्तरावर ही तुलना माणूस करतच असतो. साहित्याच्या क्षेत्रातील तुलना एकूणच साहित्याच्या कक्षा रुंदावणारी आणि समृद्ध करणारी आहे. दोन भिन्न साहित्यांची तुलना केल्याने दोहोंतील बलस्थाने आणि उणिवा लक्षात येतात. कोणत्याही साहित्याची तुलना अन्य साहित्याशी केल्यास दोहोंनाही आपापल्या भावी वाटचालीसाठी उपयुक्त असे मुद्दे सापडतात. तुलना करणे म्हणजे एखाद्याचे उणेपण दर्शवणे किंवा दुसऱ्याचे श्रेष्ठत्व दर्शविणे नव्हे. आपल्या किंवा अन्य प्रदेशांत आपल्यासारखे काय आहे किंवा आपल्यापेक्षा काय वेगळे आहे याचा शोध म्हणजे तौलनिक अभ्यास. समान वृत्तीप्रवृत्ती असूनही अनेकदा दोन भिन्न संस्कृतीतील भाषा, साहित्य यांत वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण दिसून येते. या वेगळेपणामागे असणारे घटक, दोन्ही साहित्यांवर प्रभाव पाडणारे मुद्दे यांचाही विचार तौलनिक साहित्याभ्यासात होतो.

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' हे दोन्ही साहित्यकलाप्रकार जवळच्या आणि समान भौगोलिक प्रदेशात उदयास आलेले आहेत. या दोन्ही कलाप्रकारांत वेगवेगळ्या अर्थाने समानता दिसून येत असली तरी दोहोंचे स्वत:चे असे स्वतंत्र स्थान निश्चितच आहे. या दोन्ही साहित्यकलाप्रकारांच्या तौलनिक अभ्यासातून त्यांच्यातील साम्यभेदांचाच नव्हे तर पर्यायाने दोन भिन्न संस्कृतींतील साम्यभेदांचाही परिचय अभ्यासकांना होणार आहे. रंगभूमीवर सादर होणारे, संगीताचा वापर करणारे असे हे साहित्यकलाप्रकार असले तरी त्यांच्यात वापरल्या जाणाऱ्या विविध

नाट्यघटकांचा वापर भिन्न पद्धतीने केलेला दिसून येतो. याचबरोबर, कालानुरूप दोन्ही साहित्यकलाप्रकारांचा झालेला प्रवास, त्यांच्यातील बदल, स्थित्यंतरे, दोहोंची सद्यस्थिती आणि अंतिमत: दोहोंच्या भावी वाटचालीचा वेध या दृष्टीने त्यांचा तौलनिक अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

1.7 निष्कर्ष :

1. तुलना करणे हा मानवाचा स्थायी भाव असल्याने जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर माणूस तुलनातंत्राचा वापर करत असतो.
2. मानवी जीवनाप्रमाणेच साहित्यातील साम्यभेदांच्या अभ्यासासाठी तुलनात्मक अभ्यासपद्धती अतिशय उपयुक्त आहे.
3. तौलनिक अभ्यासाच्या आधारे विविध साहित्यांतील उत्तमोत्तम बाबींचा परिचय होतो.
4. संपूर्ण विश्व व्यापणारी ही अभ्यसापद्धती असल्याने सामाजिक, सांस्कृतिक, प्रादेशिक, राजकीय, भाषिक, आर्थिक, साहित्यिक अशा वेगवेगळया पातळयांवर या अभ्यासपद्धतीचा अवलंब करता येतो.
5. तुलनात्मक अभ्यासामुळे दोन भिन्न गोष्टींतील न्यूनत्त्व हेही पर्यायाने दिसून येत असले तरी दर्जा सुधारण्याच्या आणि विकासाकरिता ही तुलना महत्त्वपूर्ण ठरते.
6. साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासामुळे साहित्य, संस्कृती, समाज यांचा अधिकाधिक विकास संभवतो.
7. तुलनात्मक अभ्यासामुळे स्व-आकलन आणि स्व-परीक्षण देखील साध्य करता येते आणि त्याद्वारे विकासाची पुढील पायरी गाठता येते.
8. तुलनात्मक अभ्यासासाठी अभ्यासकाची दृष्टी पूर्वग्रहरहित तसेच सर्वसमावेशी असणे नितांत आवश्यक ठरते.
9. तुलना केल्या जाणाऱ्या सर्व घटकांच्या अभ्यासातून त्या प्रत्येकाच्या विकासासाठी स्वतंत्र असा मुद्दा प्राप्त होत असतो.

10. तुलनात्मक साहित्याभ्यासाच्या प्रभावामुळे अन्य कार्यक्षेत्रांत नवे प्रवाह प्रस्थापित होण्याची शक्यता निर्माण होते.
11. तुलनात्मक साहित्याभ्यासात प्रत्येक घटक हा 'देणारा' आणि 'घेणारा' या दोन्ही भूमिका साकारत असतो. त्यामुळे तुलनात्मक अभ्यासपद्धती ही परस्परपूरक आणि लाभदायक असते.
12. नाट्यक्षेत्रातील तुलनात्मक अभ्यासामुळे वेगवेगळ्या प्रांतातील, विविध कालखंडातील नाट्यपरंपरांचा आणि विचारधारांचा अभ्यास करून त्याद्वारे नाट्यक्षेत्राची एकूण वाटचाल आणि सुधारणा तसेच विकासासाठीच्या दिशा निश्चित करता येतात.
13. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' या भौगोलिकदृष्ट्या नजिकच्या प्रांतातील दोन भिन्न परंतु काही बाबतीत साम्य दर्शवणाऱ्या नाट्यप्रकारांचा अभ्यास तुलनात्मक पद्धतीने करता येणे शक्य आहे.
14. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी 'तियात्र' या दोन भिन्न नाट्यप्रकारांच्या अभ्यासातून दोन्हींची बलस्थाने आणि उणिवा लक्षात येतात.

*****

1.8 संदर्भग्रंथ सूची

1. बापट वसंत, तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती सप्टेंबर 1981
2. तत्रैव, पृष्ठ क्र. 23
3. तत्रैव, पृष्ठ क्र. 24
4. तत्रैव, पृष्ठ क्र. 25
5. तत्रैव, पृष्ठ क्र. 26
6. तत्रैव, पृष्ठ क्र. 27
7. तत्रैव, पृष्ठ क्र. 28
8. तत्रैव, पृष्ठ क्र. 60
9. तत्रैव, पृष्ठ क्र. 61
10. तत्रैव, पृष्ठ क्र. 63
11. तत्रैव, पृष्ठ क्र. 64
12. तत्रैव, पृष्ठ क्र. 65
13. जहागिरदार चंद्रशेखर, तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती 1992
14. तत्रैव, पृष्ठ क्र. 27
15. तत्रैव, पृष्ठ क्र. 28
16. तत्रैव, पृष्ठ क्र. 29
17. तत्रैव, पृष्ठ क्र. 30
18. तत्रैव, पृष्ठ क्र. 31
19. तत्रैव, पृष्ठ क्र. 32
20. तत्रैव, पृष्ठ क्र. 33
21. तत्रैव, पृष्ठ क्र. 34

22. तत्रैव, पृष्ठ क्र. 35
23. मिरजकर निशिकांत, तौलनिक साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 15 ऑगस्ट 2016
24. तत्रैव, पृष्ठ क्र. 11
25. तत्रैव, पृष्ठ क्र. 12
26. तत्रैव, पृष्ठ क्र. 13
27. तत्रैव, पृष्ठ क्र. 14
28. तत्रैव, पृष्ठ क्र. 15
29. तत्रैव, पृष्ठ क्र. 16
30. तत्रैव, पृष्ठ क्र. 17
31. तत्रैव, पृष्ठ क्र. 18
32. तत्रैव, पृष्ठ क्र. 19
33. तत्रैव, पृष्ठ क्र. 20
34. तत्रैव, पृष्ठ क्र. 21
35. तत्रैव, पृष्ठ क्र. 22
36. तत्रैव, पृष्ठ क्र. 23
37. तत्रैव, पृष्ठ क्र. 24
38. तत्रैव, पृष्ठ क्र. 110
39. तत्रैव, पृष्ठ क्र. 111
40. तत्रैव, पृष्ठ क्र. 112
41. तत्रैव, पृष्ठ क्र. 113
42. तत्रैव, पृष्ठ क्र. 114
43. तत्रैव, पृष्ठ क्र. 115
44. थळी प्रकाश, ‘तियात्रा’चो इतिहास, गोवा कोंकणी अकादमी, पहिली आवृत्ती 1993

45. देशपांडे वि. भा., मराठी नाटक-नाटककार : काळ आणि कर्तृत्व (खंड 1), दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 31 मे 2008
46. सरदेसाई माया, भारतीय रंगभूमीची परंपरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 20 मार्च 1996